# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## शिष्यवृत्ती परीक्षा सन - २०१८-१९ अधिसूचना

| | |
|---|---|
| इयत्ता ५ वी | ➢ पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PRE UPPER PRIMARY SCHOLARSHIP EXAMINATION)<br>➢ शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा<br>➢ आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा<br>➢ विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा |
| इयत्ता ८ वी | ➢ पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (PRE SECONDARY SCHOLARSHIP EXAMINATION) |


# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे -४११ ००१.

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६१२३०६६/६७

Website : www.mscepune.in व http://puppss.mscescholarshipexam.in

**<u>अधिसूचना</u>**

**परीक्षा प्राधान्य**

जा.क्र.मरापप/शिष्यवृत्ती/२०१८-१९/८३०८
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक : १९/१०/२०१८

**प्रति,**

१. शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्य.)
जिल्हा परिषद, सर्व
२. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका,
३. शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई
उत्तर/दक्षिण/पश्चिम विभाग
४. प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन
पुसेगाव/धुळे/अमरावती/औरंगाबाद/केळापूर
५. संचालक, विमुक्त जाती व भटक्या जमाती संचालनालय, पुणे
६. प्रशासन अधिकारी / शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी, म.न.पा. शिक्षण मंडळ
७. गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती, (सर्व)

**विषय :- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा दि. १७ फेब्रुवारी, २०१९ रोजी आयोजित करणेबाबतची अधिसूचना...**

शासनमान्य शाळांमधून सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा व शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेमध्ये प्रविष्ठ होण्यासाठी तसेच इयत्ता ८ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ठ होण्यासाठी अधिसूचनेत नमूद केलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या व या परीक्षेस प्रविष्ठ होण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन आवेदनपत्र परिषदेच्या www.mscepune.in व http://puppss.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर दि. १९/१०/२०१८ रोजी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

उपरोक्त परीक्षा दि. १७ फेब्रुवारी, २०१९ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये एकाच वेळेस घेण्यात येतील. परीक्षेचे वेळापत्रक व परीक्षेची सविस्तर माहिती सोबतच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. **प्रत्येक सूचना वाचूनच कार्यवाही करण्याची दक्षता प्रत्येकाने घ्यावी.**

**सोबत :- अधिसूचना**

**स्वाक्षरीत/-**

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०१**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | शिष्यवृत्ती परीक्षेचे वेळापत्रक | ०४ |
| १.१ | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे (PUPSE) वेळापत्रक | ०४ |
| १.२ | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे (PSSE) वेळापत्रक | ०४ |
| १.३ | ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबतचे वेळापत्रक | ०५ |
| २ | शिष्यवृत्ती परीक्षेचे स्वरूप | ०५ |
| ३ | शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पात्रता | ०५ |
| ४. | विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेस प्रविष्ट होण्याबाबतचे पात्रता निकष | ०६ |
| ५. | परीक्षेचे माध्यम | ०७ |
| ६. | वयोमर्यादा | ०७ |
| ७. | परीक्षा शुल्क | ०८ |
| ८. | शुल्क भरण्याची पध्दत | ०९ |
| ९. | परीक्षा परिषद शाळा सांकेतांक | ०९ |
| १०. | ग्रामीण, शहरी शाळा निकष | ०९ |
| ११. | C.B.S.E. व I.C.S.E. अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या शाळांबाबत | ०९ |
| १२. | बार्टी शिष्यवृत्ती | १० |
| १३. | ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठीच्या सर्वसाधारण सूचना | १० |
| १४. | परीक्षा आयोजनाबाबत सर्वसाधारण माहिती | ११ |
| १५. | ऑनलाईन आवेदनपत्र भरताना आवश्यक बाबीं/कागदपत्रे | १२ |

## १. परीक्षेचे वेळापत्रक

### १.१ पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा.

**रविवार दि. १७ फेब्रुवारी, २०१९**

| पेपर | विषय | प्रश्न संख्या | गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम भाषा | २५ | ५० | ११.०० ते १२.३० |
| | गणित | ५० | १०० | |
| **एकूण** | | **७५** | **१५०** | |
| २ | तृतीय भाषा | २५ | ५० | १.३० ते ३.०० |
| | बुध्दिमत्ता चाचणी | ५० | १०० | |
| **एकूण** | | **७५** | **१५०** | |

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतूनच विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन, आदिवासी विद्यानिकेतन व शासकीय विद्यानिकेतनमध्ये प्रवेशासाठी निकषानुसार व गुणवत्तेनुसार पात्र विद्यार्थ्यांच्या नावांच्या शिफारसी केल्या जातील. तसेच गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जातील.

### १.२ पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा :- रविवार दि. १७ फेब्रुवारी, २०१९

| पेपर | विषय | प्रश्न संख्या | गुण | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम भाषा | २५ | ५० | ११ ते १२.३० |
| | गणित | ५० | १०० | |
| **एकूण** | | **७५** | **१५०** | |
| २ | तृतीय भाषा | २५ | ५० | १.३० ते ३.०० |
| | बुध्दीमत्ता चाचणी | ५० | १०० | |
| **एकूण** | | **७५** | **१५०** | |

## १.३ ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबतचे वेळापत्रक :-

| शुल्क प्रकार | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| **नियमित शुल्कासह (With Regular Fees)** | इ. ५ वी/इ. ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेकरीता शाळा माहिती प्रपत्र व आवेदनपत्र व शुल्क ऑनलाईन भरणे. | १९ ऑक्टोबर २०१८ ते ३० नोव्हेंबर २०१८ |
| **विलंब शुल्कासह (With Late Fees)** | इ. ५ वी/इ. ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेकरीता शाळा माहिती प्रपत्र व आवेदनपत्र व शुल्क ऑनलाईन भरणे. | ०१ डिसेंबर २०१८ ते १५ डिसेंबर २०१८ |
| **अतिविलंब शुल्कासह (With Super Late fees)** | इ. ५ वी/इ. ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेकरीता शाळा माहिती प्रपत्र व आवेदनपत्र व शुल्क ऑनलाईन भरणे. | १६ डिसेंबर २०१८ ते ३१ डिसेंबर २०१८ |
| **अति विशेष विलंब शुल्कासह (With Super Special Late fees)** | इ. ५ वी/इ. ८ वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेकरीता शाळा माहिती प्रपत्र व आवेदनपत्र व शुल्क ऑनलाईन भरणे. | ०१ जानेवारी २०१९ ते १५ जानेवारी २०१९ |
| **दि. १५/०१/२०१९ नंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरता येणार नाहीत.** | | |

## २) शिष्यवृत्ती परीक्षेचे स्वरूप :-

- परीक्षेचे स्वरुप पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या दोन्ही प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाचे असतील.
- प्रत्येक पेपरसाठी बहुसंच **(A, B, C, D)** प्रश्नसंच देण्यात येतील.
- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) साठी उत्तरांच्या ४ पर्यायांपैकी एकच पर्याय अचूक असेल परंतु **पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) साठीच्या प्रत्येक पेपरमध्ये कमाल २०% प्रश्नांच्या बाबतीत उत्तरांच्या ४ पर्यायांपैकी दोन पर्याय अचूक असतील. ते दोन्ही पर्याय नोंदविणे बंधनकारक असेल.**

## ३) शिष्यवृत्ती परीक्षेसाठी पात्रता :-

१. विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा म्हणजेच पालकांचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.

२. विद्यार्थी शासनमान्य शासकीय / अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित / स्वयंअर्थसहाय्यित शाळेत इ. ५ वी किंवा इ. ८ वी मध्ये शिकत असावा.

## ४) विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेस प्रविष्ट होण्याबाबतचे पात्रता निकष :-

➢ **शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा** :-

१) पुसेगाव, जि. सातारा २) धुळे ३) औरंगाबाद ४) अमरावती ५) केळापूर, जि. यवतमाळ या ठिकाणी शासकीय विद्यानिकेतन आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी खालील अटीत बसणारा असावा.

1. इयत्ता 5 वी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी असावा.
2. शाळा ग्रामीण भागातील असावी.
3. फक्त मुलगा असावा. (मुलींना या विद्यानिकेतनमध्ये प्रवेश नाही.)
4. आवेदनपत्रातील शासकीय विद्यानिकेतनमध्ये प्रवेश हवा आहे काय ? या पर्यायासमोरील '**होय**' हा पर्याय नोंदविणे आवश्यक आहे.
5. फक्त मराठी माध्यमातील असावा.

➢ **आदिवासी शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा** :-

सदर परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी खालील अटीत बसणारा असावा.

1. इयत्ता 5 वी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी असावा.
2. फक्त मुलगा असावा. (मुलींना या विद्यानिकेतनमध्ये प्रवेश नाही.)
3. अनुसूचित जमातीपैकी (एस. टी.) असावा.
4. शासनाने ठरवून दिलेल्या आदिवासी क्षेत्रातील असावा.
5. आवेदनपत्रातील आदिवासी विद्यानिकेतनमध्ये प्रवेश हवा आहे काय ? या पर्यायासमोरील '**होय**' हा पर्याय नोंदविणे आवश्यक आहे.

➢ **विमुक्त जाती, भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा** :-

वि.जा.भ.ज. विद्यानिकेतन कमळेवाडी, पो. शिरुर (दबडे), ता. जि. नांदेड हे या ठिकाणी आहे. सदर परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थी खालील अटीत बसणारा असावा.

1. इयत्ता 5 वी मध्ये शिकत असलेला विद्यार्थी असवा.
2. आश्रमशाळेतील विद्यार्थी असावा.
3. आवेदनपत्रातील वि.जा.भ.ज. विद्यानिकेतनमध्ये प्रवेश हवा आहे काय ? या पर्यायासमोरील '**होय**' हा पर्याय नोंदविणे आवश्यक आहे.

## ५) परीक्षेचे माध्यम:-

५.१ परीक्षा एकूण आठ माध्यमांमध्ये घेतली जाईल.

१. मराठी  २. उर्दू  ३. हिंदी  ४. गुजराती

५. इंग्रजी  ६. सिंधी  ७. तेलुगु  ८. कन्नड

५.२ उपरोक्त आठ माध्यमांशिवाय सेमी इंग्रजी हा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील सात पर्याय उपलब्ध आहेत.

१. मराठी + इंग्रजी  २. उर्दू + इंग्रजी  ३. हिंदी + इंग्रजी  ४. गुजराती + इंग्रजी

५. सिंधी + इंग्रजी  ६. तेलुगु + इंग्रजी  ७. कन्नड + इंग्रजी

५.३ पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी (इ. ८ वी) ऑनलाईन आवेदनपत्रात सेमी इंग्रजी हा पर्याय नोंदविणाऱ्या **विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळी पेपर १ मधील गणित या विषयाची व पेपर २ मधील बुध्दिमत्ता चाचणी या विषयाची प्रश्नपत्रिका मूळ माध्यम व इंग्रजी माध्यम अशा दोन्ही माध्यमातून देण्यात येईल. त्यामुळे ऑनलाईन आवेदनपत्रातील परीक्षेचे माध्यम निवडताना दक्षता घ्यावी.**

## ६) वयोमर्यादा :-

६.१ या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय दि. ०१ जून २०१८ रोजी खाली दर्शवलेल्या तक्त्यातील वयापेक्षा जास्त नसावे.

| परीक्षेचे नाव | प्रवर्ग | |
|---|---|---|
| | सर्व प्रवर्ग | दिव्यांग |
| पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी), शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा | ११ वर्षे | १५ वर्षे |
| पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) | १४ वर्षे | १८ वर्षे |

६.२ आवेदनपत्रात विद्यार्थ्यांची जन्मतारीख चुकीची नोंदविल्याने विद्यार्थी गुणवत्ताधारक असूनही केवळ सदर चुकीमुळे शिष्यवृत्ती पासून वंचित राहू शकतो. त्यामुळे मुख्याध्यापकांनी स्वत: शाळेच्या जनरल रजिस्टरवरून जन्मतारखेची खात्री करुनच अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे.

६.३ चुकीची जन्मतारीख नोंदवून विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरल्यास संबंधित मुख्याध्यापकांविरूध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. अस्तित्वात नसलेली जन्मतारीख रजिस्टरमध्ये

नोंदविलेली असेल (उदा. ३१ एप्रिल) ती ऑनलाईन आवेदनपत्रात न नोंदवता योग्य त्या कार्यपध्दतीनुसार बदल करून त्यानंतरच आवेदनपत्रात भरावी.

**६.४ उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या वयोमर्यादेपेक्षा जास्त वय असलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरल्यास स्क्रीनवर 'विहित कमाल वयोमर्यादेपेक्षा वय जास्त असल्याने विद्यार्थी शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यास अपात्र ठरत असला तरीही त्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येईल' असा मेसेज दिसेल. अशा विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेस प्रवेश मिळेल परंतु ते विद्यार्थी शिष्यवृत्तीस अपात्र ठरतील.**

## ७) परीक्षा शुल्क :-

**७.१** शासन निर्णय क्र.एस.पी.ई.(२०११/८५९/११) साशि-१, दि. ०३/१२/२०१२, शासन निर्णय क्र. एफईडी-४०१४/६४३/प्र.क्र.४/एसडी-५, दि. १५/११/२०१६ व कार्यकारी समिती सभा क्र. २९, दि. १२/०४/२०१८, ठराव क्र. ४७० नुसार दर पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | शुल्काचा प्रकार | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५वी) | | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८वी) | |
|---|---|---|---|---|---|
| | | बिगरमागास | मागास/दिव्यांग | बिगर मागास | मागास/दिव्यांग |
| १. | प्रवेश शुल्क | रु. २०/- | रु. २०/- | रु. २०/- | रु. २०/- |
| २. | परीक्षा शुल्क | रु. ६०/- | नाही | रु. ६०/- | नाही |
| ३. | एकूण शुल्क | रु. ८०/- | रु. २०/- | रु. ८०/- | रु. २०/- |
| ४. | विलंब शुल्क (नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत संपल्यानंतर) | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५०/- | रु. ५०/- |
| ५. | अतिविलंब शुल्क (विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत संपल्यानंतर) | **प्रवेश शुल्क + परीक्षा शुल्क + विलंब शुल्क + अतिविलंब शुल्क रु. १०/- प्रतिदिन / प्रति विद्यार्थी याप्रमाणे.** | | | |
| ६. | अति विशेष विलंब शुल्क (अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत संपल्यानंतर) | **प्रवेश शुल्क + परीक्षा शुल्क + विलंब शुल्क + अतिविलंब शुल्क + अति विशेष विलंब शुल्क रु. २०/- प्रतिदिन / प्रति विद्यार्थी याप्रमाणे.** | | | |
| ६. | शाळा संलग्नता शुल्क रु २००/- (NTS/NMMS परीक्षेकरीता परीक्षा परिषद शाळा संलग्नता शुल्क भरले असले तरी शिष्यवृत्ती परीक्षेकरीता स्वतंत्रपणे शाळा संलग्नता शुल्क रु. २००/- भरणे अनिवार्य राहील.) | | | | |

**७.२ महाराष्ट्र शासनाचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या (MSCERT) शाळेतील SC, ST, VJ-A, NT-B, NT-C, NT-D या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क नाही. मात्र ही सवलत CBSE, ICSE व इतर अभ्यासक्रमाच्या शाळातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लागू नाही.**

**७.३ उर्वरित SBC, OBC, Open या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागेल.**

**७.४ कोणत्याही अभ्यासक्रमाच्या शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यासाठी परीक्षा शुल्क लागू नाही.**

## ८) शुल्क भरण्याची पध्दत :-

या परीक्षांसाठी दिलेल्या उपरोक्त शुल्काप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांचे होणारे एकूण **शुल्क शाळांनी इ. ५ वी व इ. ८ वी करिता स्वतंत्रपणे ऑनलाईन पेमेंट या पर्यायाची निवड करुन ऑनलाईन भरावे.**

**ज्या जिल्ह्यांमध्ये शिष्यवृत्ती परीक्षेची विद्यार्थ्यांच्या शुल्कांची रक्कम जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून / मनपाकडून भरली जाते, त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी सदर रक्कम तात्काळ उपलब्ध करुन घ्यावी व परिषदेच्या खात्यावर ऑनलाईन पेमेंटव्दारे दि. ०५ जानेवारी, २०१९ अखेरपर्यंत भरावी. अशा जिल्ह्यांना शुल्क भरण्यास कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.**

## ९) परीक्षा परिषद शाळा सांकेतांक :-

शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून शिष्यवृत्ती परीक्षेचे सर्व कामकाज युडायस कोडनुसार करण्यात येत आहे. **त्यामुळे परीक्षा परिषद शाळा सांकेतांक नोंदविण्याची आवश्यकता नाही.**

## १०) ग्रामीण, शहरी शाळा निकष :-

१०.१ शासन निर्णय क्रमांक विशेष-२००५/(४७/०५)/साशि-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ व शासन निर्णय क्र. एफईडी-४०१४/६४३/प्र.क्र.४/एसडी-५, दि. १५/११/२०१६ अन्वये पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेसाठी (पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा) राज्यातील ग्रामपंचायतीच्या नियंत्रणाखालील सर्व गावे / वस्ती (लोकसंख्या विचारात न घेता) तसेच नगरपरिषद, नगरपालिका व महानगरपालिका परिक्षेत्रात ग्रामपंचायत क्षेत्र (अस्तित्वात असल्यास) अशा सर्व गावांमधील शाळांमधील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची गणना **"ग्रामीण"** भागात करण्यात यावी. उर्वरित ठिकाणच्या शाळांची गणना **"शहरी"** भागात करण्यात यावी. **शाळा ज्या क्षेत्रात आहे तेच क्षेत्र ग्राह्य धरण्यात येईल.**

**१०.२ दि. १९/१०/२०१८ पासून शिष्यवृत्ती परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यास सुरूवात होणार असल्याने दि. १८/१०/२०१८ या दिनांकास / दिनांकापूर्वी जी स्थिती असेल ती शहरी / ग्रामीण बाबत ग्राहय धरण्यात येईल.**

**उदा :- एखाद्या गावातील ग्रामपंचायतीचे रुपांतर दि. १८/१०/२०१८ या तारखेनंतर पंचायत / नगरपरिषद / नगरपालिका इ. मध्ये झाले असल्यास संबंधित शाळा शहरी क्षेत्राऐवजी ग्रामीण क्षेत्रातच ग्राहय धरली जाईल.**

## ११) C.B.S.E. व I.C.S.E. अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या शाळांबाबत :-

शासननिर्णय क्र. एस.पी.ई.२००९/९३९७९/(२०३/२००१)/साशि-१, दिनांक १०/१०/२००१ नुसार I.C.S.E. आणि C.B.S.E. अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या शाळेतील विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होऊ शकतील. या अभ्यासक्रमाची राज्यातील पहिल्या ५० विद्यार्थ्यांना स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार केली जाते. या गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांना तसे प्रमाणपत्र दिले जाते, **मात्र त्यांना शिष्यवृत्ती अदा केली जात नाही.**

## १२) बार्टी शिष्यवृत्ती :-

मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या कार्यालयामार्फत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्य प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती' अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सन २०१४ पासून देण्यात येते.

त्यानुसार इ. ५ वी व इ. ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेतील कट ऑफ लिस्टच्या खालील पात्र विद्यार्थ्यांपैकी शिष्यवृत्ती न मिळालेल्या अनुसूचित जाती या संवर्गातील विद्यार्थ्यांची यादी पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे यांच्याकडे पाठविण्यात येईल.

## १३) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठीच्या सर्वसाधारण सूचना :-

१. पूर्व उच्च प्राथमिक/पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेस बसण्यास इच्छुक विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे शाळेने ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाची आहेत. ऑफलाईन पध्दतीने आवेदनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत.

२. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि विद्यानिकेतन प्रवेश (शासकीय, आदिवासी, विजाभज) परीक्षा यासाठी एकत्रित एकच आवेदनपत्र आहे. त्यात इच्छुक विद्यार्थ्यांसाठी विद्यानिकेतन प्रवेशासाठी पात्रतेनुसार विकल्प उपलब्ध आहेत.

**३. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन आवेदनपत्रांची प्रिंट परीक्षा परिषदेकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी (प्रपत्र-अ), ऑनलाईन आवेदनपत्रांची प्रिंट, आवश्यक प्रमाणपत्रे व शुल्क भरलेल्या ऑनलाईन पेमेंटची रिसिट इत्यादी कागदपत्रे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपल्या दप्तरी जतन करून ठेवावीत.**

४. ऑनलाईन आवेदनपत्रासाठी विद्यार्थ्यांचा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करून अपलोड करणे अनिवार्य राहील.

५. विदर्भातील ११ जिल्हयांतील पालकांचे वार्षिक उत्पन्न रू.२०,०००/- पेक्षा कमी असल्यास त्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे (तहसीलदार / प्रांत अधिकारी) प्रमाणपत्र अपलोड करणे अनिवार्य आहे.

६. विद्यार्थ्यांचे पालक रु.२००००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणारे भूमिहीन शेतमजूर असल्यास भूमिहीन शेतमजूर व रू.२०,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असल्याबाबत सक्षम अधिकारी यांनी दिलेली दोन्ही प्रमाणपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे.

७. मुद्दा क्रमांक ५ व ६ मधील प्रमाणपत्रांची संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्यांच्या स्तरावरुन तपासणी करणे बंधनकारक आहे.

८. आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्यापूर्वी आवेदनपत्रे भरण्याच्या सर्वसामान्य सूचना आणि आवेदनपत्रातील मुद्देनिहाय सूचना व कृती ओघ तक्ता (Flow Chart) यांचे काळजीपूर्वक वाचन करावे. त्यानंतरच ऑनलाईन आवेदनपत्रे भरावीत.

९. संगणकाची व इंटरनेटची पुरेशी माहिती असलेल्या कर्मचाऱ्यांची / व्यक्तींची ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी मदत घ्यावी.

१०. शाळेमध्ये इंटरनेट कनेक्शन नसल्यास अन्य ठिकाणाहून (इंटरनेट कनेक्शन उपलब्ध असलेल्या शाळा, नेट कॅफे इ.) आवेदनपत्र भरावीत.

११. नेट कॅफेमधून ऑनलाईन आवेदनपत्र भरल्यास मुख्याध्यापकाने शाळेच्या लॉगीनमधून भरलेली सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करुनच सबमीट करावे. तसेच सर्व विद्यार्थ्यांचे शुल्क भरले गेल्याची खात्री स्वतः मुख्याध्यापकांनी करावी. या संबंधी भविष्यात काही प्रश्न उदभवल्यास त्यास परीक्षा परिषद जबाबदार राहणार नाही.

१२. परीक्षा परिषदेने आवेदनपत्रे भरण्यासाठी कोणत्याही केंद्रास / केंद्रांना परवानगी किंवा मान्यता दिलेली नाही. शाळेने आपल्या सोयीनुसार इंटरनेट कनेक्शन उपलब्ध असलेल्या ठिकाणी ऑनलाईन आवेदनपत्रे भरावीत.

१३. ऑनलाईन आवेदनपत्रे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व http://puppss.mscescholarshipexam.in या अधिकृत संकेतस्थळावर भरावीत.

१४. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यापूर्वी आवेदनपत्र भरण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना आवेदनपत्रातील सर्व मुद्दयांबाबत माहिती देऊन अवगत करावे.

१५. आवेदनपत्र भरण्यासाठी वेगवान इंटरनेट (Broadband) कनेक्शनचा उपयोग करावा.

१६. आवेदनपत्रे भरण्यासाठी शाळांना अकरा अंकी UDISE कोड क्रमांक अनिवार्य आहे.

**१७. विद्यार्थ्यांचा सरल स्टुडंट आय. डी. उपलब्ध असल्यास त्याव्दारे अथवा सरल स्टुडंट आय. डी. उपलब्ध नसल्यास मॅन्युअल पध्दतीनेही ऑनलाईन आवेदनपत्र भरता येईल.**

१८. आवेदनपत्रातील सर्व मुद्दयांची माहिती शाळेच्या रेकॉर्डप्रमाणे अचूक असणे आवश्यक आहे. ऑनलाईन आवेदनपत्रात अचूक माहिती भरणे ही संबंधित मुख्याध्यापकांची जबाबदारी आहे.

१९. आवेदनपत्रातील सर्व अनिवार्य मुद्दयांची माहिती भरल्याशिवाय ऑनलाईन आवेदनपत्र save होणार नाही.

२०. Login Id व Password जतन करून ठेवावेत. ते त्रयस्थ व्यक्तीला देऊ नयेत.

## १४) परीक्षा आयोजनाबाबत सर्वसाधारण माहिती :-

१. प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका सीलबंद स्वरुपात देण्यात येतील.

२. **कार्बनलेस उत्तरपत्रिका देण्यात येत असल्याने सदर उत्तरपत्रिकांची डिजिटल स्कॅन प्रत (छायाप्रत) देण्यात येणार नाही.**

३. उत्तरपत्रिकेत गिरवलेली / खाडाखोड केलेली उत्तरे ग्राहय धरली जाणार नाहीत. एकदा नोंदविलेले उत्तर बदलता येणार नाही.

४. परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची तपासणी OMR पध्दतीने केली जाणार आहे.

५. कोणत्याही परिस्थितीत उत्तरपत्रिकेतील वर्तुळ पेन्सिलने भरु नयेत. पेन्सिलने नोंदविलेल्या उत्तरांना शून्य गुण दिले जातील.

६. शिष्यवृत्ती परीक्षेची परीक्षापूर्व कामे, उत्तरपत्रिकांची तपासणी, शिष्यवृत्तीधारकांची निश्चिती, विद्यानिकेतन प्रवेश निवड याद्या, विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रे व परीक्षेची सर्व सांख्यिकीय माहिती संगणकावर तयार केली जाते.

## १५) सदर शिष्यवृत्ती परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरताना आवश्यक बाबीं/कागदपत्रे खालीलप्रमाणे :-

१. विद्यार्थ्याची फोटोसह स्वाक्षरीची एकत्रित स्कॅन कॉपी (jpg/jpeg/png/bmp format मध्ये 100 kb पेक्षा जास्त नसावी)

उदा.:-

| |
|---|
| **विद्यार्थ्याचा फोटो** |
| **विद्यार्थ्याची स्वाक्षरी** |

२. विद्यार्थ्याच्या बँक खात्याची माहिती (बँकेचे नाव, IFS Code व बँक खाते क्रमांक)

३. विद्यार्थ्याचा आधार क्रमांक किंवा आधार एनरॉलमेंट क्रमांक.

४. विदर्भातील ११ जिल्हयातील पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.२००००/- पेक्षा कमी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे (तहसीलदार / प्रांत अधिकारी) प्रमाणपत्रे.

५. विद्यार्थ्याचे पालक रु.२००००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणारे भूमिहीन शेतमजूर असल्यास भूमिहीन शेतमजूर व रू.२०,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असल्याबाबत सक्षम अधिकारी यांनी दिलेली दोन्ही प्रमाणपत्रे.

६. संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीची स्कॅन कॉपी.

**पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा रविवार दिनांक १७ फेब्रुवारी, २०१९ च्या कामकाजाबाबतची माहिती वरीलप्रमाणे असून त्यात होणारे बदल वेळोवेळी कळविले जातील. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत.**

सदर अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या पुढील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. www.mscepune.in व http://puppss.mscescholarshipexam.in

**स्वाक्षरीत/-**

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१**

**प्रत - माहितीसाठी सविनय सादर**

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा. संचालक, (माध्य. व उच्च माध्य. ) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मा. संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.